**(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**(मा. मुख्य न्यायमूर्ती एम. एन. वेंकटाचलैय्या आणि मा. न्यायमूर्ती एस. मोहन आणि एस. बी. मजमुदार यांचे समोर)**

**दिल्ली घरगुती श्रमिक महिला मंच (दिल्ली डोमेस्टिक वर्कींग वुमेन्स फोरम) .... याचिकाकर्ते**

**विरुद्ध**

**भारतीय संघराज्य आणि इतर ... उत्तरवादी.**

रिट याचिका (फौ.) क्र. ३६२/१९९३*, १९ ऑक्टोबर १९९४ रोजी निर्णीत करण्यात आलेली.

**अ. भारताचे संविधान ------- अनुच्छेद ३२ आणि २१ ------ घरगुती श्रमिक महिलांवरील बलात्कार ----- बलात्कार पीडितांना नुकसान भरपाई आणि त्यांचे पुनर्वसन ----- त्यासंदर्भात योजना, राष्ट्रीय महिला आयोगास महिलांसाठी विकसित केलेल्या राष्ट्रीय महिला आयोग कायद्याच्या कलम १० अंतर्गत सहा महिन्यांच्या आत कार्यवाही करण्याचे निर्देश आणि त्यानंतर, भारतीय संघराज्याने त्याची तपासणी करण्याचे आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश ------ राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९०, कलम १० ------ दंड संहिता, १८६० , कलम ३७६-ब सह कलम ३४१ (परिच्छेद १७ आणि १८)**

ऑक्सफर्ड हँडबुक ऑफ क्रिमिनोलॉजी (प्रकाशन १९९४), पृष्ठ क्र. १२३७-३८च्या आधारे

**ब. दंड संहिता, १८६० ----- कलम ३७६----- बलात्कार ----- बलात्कार पीडितांना मदत करण्यासाठी दिलेले व्यापक मापदंड ------ बलात्कार आणि त्या संदर्भात नमूद केलेल्या विद्यमान गुन्हेगारी न्याय व्यवस्थेतील दोषांमुळे उद्भवणाऱ्या समस्या ---- भारताचे संविधान, अनुच्छेद ३२, २१ आणि १४------- न्यायिक सक्रियता**

अलीकडच्या काळात महिलांवरील हिंसाचारात वाढ झाल्याने गंभीर चिंता निर्माण झाली आहे हे दुर्दैवी आहे. बलात्कार खरोखरच गुन्हेगारी न्याय व्यवस्थेसाठी अनेक समस्या निर्माण करतो. कठोर शिक्षांसाठी आवाज उठवला जातो, परंतु अनेकदा अशा आवाज उठवल्याने पीडितेची खरी दुर्दशा अधोरेखित होते. बलात्कार हा पीडितांच्या जीवनाचा पाया हादरवणारा प्रसंग असतो. अनेकांसाठी, त्याचा परिणाम दीर्घकालीन असतो, ज्यामुळे त्यांची वैयक्तिक नातेसंबंधांची क्षमता कमी होते, त्यांचे वर्तन आणि मूल्ये बदलतात आणि अंतहीन भीती निर्माण होते.बलात्काराच्या आघाताव्यतिरिक्त, पीडितांना कायदेशीर कार्यवाहीदरम्यान आणखी त्रास सहन करावा लागतो.

(परिच्छेद १३)

सध्याच्या व्यवस्थेतील दोष पुढीलप्रमाणे आहेत : पहिली गोष्ट म्हणजे, तक्रारी स्थूलपणे हाताळल्या जातात आणि आवश्यकतेनुसार त्यांच्याकडे लक्ष दिले जात नाही.पीडितांना अनेकदा पोलिसांकडून अपमानित केले जाते.पीडितांना नेहमीच बलात्काराच्या खटल्यांचा एक वेदनादायक अनुभव आला आहे. न्यायालयात जबाब देण्याचा अनुभव नकारात्मक आणि विघातक राहिला आहे. पीडित अनेकदा म्हणतात की, त्यांना ही अग्निपरीक्षा बलात्काराच्या

घटनेपेक्षाही वाईट वाटली. निःसंशयपणे, न्यायालयीन कार्यवाहीने बलात्काराच्या परिणामी त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या मानसिक त्रासात भर टाकत तो वाढवला.

(परिच्छेद १४ )

या पार्श्वभूमीवर, बलात्कार पीडितांना मदत करण्यासाठी व्यापक मापदंड सूचित करणे आवश्यक आहे.

(१) लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांच्या तक्रारदारांना कायदेशीर प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे. गुन्हेगारी न्यायव्यवस्थेशी परिचित असलेली एखादी व्यक्ती सोबत असणे महत्वाचे आहे. पीडितेच्या वकिलाची भूमिका केवळ पीडितेला कार्यवाहीचे स्वरूप समजावून सांगणे, तिला खटल्यासाठी तयार करणे आणि पोलिस स्टेशनमध्ये आणि न्यायालयात तिला मदत करणे ही नाही तर तिला इतर संस्थांकडून वेगळ्या स्वरूपाची मदत कशी मिळू शकेल याबद्दल मार्गदर्शन करणे, उदाहरणार्थ, मानसिक समुपदेशन किंवा वैद्यकीय सहाय्य. पोलिस ठाण्यातील तक्रारदाराच्या हिताची काळजी घेणारी तीच व्यक्ती प्रकरणाच्या शेवटापर्यंत तिचे प्रतिनिधित्व करेल याची खात्री करून सेवा सुरू ठेवणे महत्वाचे आहे.

(२) पोलिस स्टेशनमध्ये कायदेशीर सेवा द्यावी लागेल कारण लैंगिक अत्याचाराची पीडिता पोलिस स्टेशनमध्ये आल्यावर खूप व्यथित अवस्थेत असू शकते, या टप्प्यावर आणि तिची चौकशी केली जात असताना वकिलाचे मार्गदर्शन आणि समर्थन तिला खूप सहाय्य करेल.

(३) पीडितेला कोणतेही प्रश्न विचारण्यापूर्वी तिच्या प्रतिनिधीत्वाच्या अधिकाराची माहिती देणे हे पोलिसांचे कर्तव्य असले पाहिजे आणि पोलिस अहवालात असे नमूद केले पाहिजे की पीडितेला तशी माहिती देण्यात आली होती.

(४) ज्या पीडितांचा विशिष्ट वकील ठरलेला नसेल किंवा ज्यांचा स्वतःचा वकील उपलब्ध नसेल अशा पीडितांसाठी या प्रकरणांमध्ये कारवाई करण्यास इच्छुक असलेल्या वकिलांची यादी पोलीस ठाण्यात ठेवली पाहिजे.

(५) पोलिसांनी लवकरात लवकर सोयीस्कर क्षणी अर्ज केल्यावर न्यायालयाकडून वकिलाची नियुक्ती केली जाईल, परंतु पीडितांची अनावश्यक विलंब न करता चौकशी केली जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी, न्यायालयाची परवानगी मागण्यापूर्वी किंवा मिळवण्यापूर्वी पोलिस ठाण्यात कारवाई करण्यासाठी वकिलांना अधिकृत केले जाईल.

(६) बलात्काराच्या सर्व खटल्यांमध्ये आवश्यकतेनुसार पीडितेची अनामिकता राखली गेली पाहिजे.

(७) भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३८(१) अंतर्गत असलेल्या निर्देशक तत्त्वांचा विचार करून फौजदारी पात्र जखमांचे नुकसान भरपाई मंडळाची स्थापना करणे आवश्यक आहे. बलात्कार पीडितांना अनेकदा मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागते. उदाहरणार्थ, काही नोकरी सुरू ठेवण्यासाठी खूप अघातग्रस्त असतात.

(८) गुन्हेगाराला दोषी ठरवल्यानंतर न्यायालयद्वारे आणि दोषसिद्धी झाली असो वा नसो, फौजदारी पात्र जखमांचे नुकसान भरपाई मंडळाद्वारे पीडितांसाठी

नुकसानभरपाई दिली जाईल. हे मंडळ पीडितेला झालेल्या वेदना, यातना आणि धक्का तसेच बलात्काराच्या परिणामी गर्भधारणा झाल्यास कमाई मध्ये होणारे नुकसान आणि बाळाच्या जन्माचा खर्च विचारात घेईल.

(परिच्छेद १५ )

मॉडर्न लीगल स्टडीज रेप अँड द लीगल प्रोसेस - लेखिका जेनिफर टेमकिन, प्रकाशन १९८७ पृ. ७ , च्या अधारे

सध्याच्या परिस्थितीमध्ये, अशा दुर्दैवी पीडितांचे अश्रू पुसण्यासाठी उत्तरवादी क्र. ३ ला अशी योजना विकसित करावी लागेल. अशी योजना या निर्णयाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत तयार केली जाईल. त्यानंतर, भारतीय संघराज्य याची तपासणी करेल आणि योजनेच्या अंमलबजावणीसाठी लवकरात लवकर आवश्यक ती पावले उचलेल.

(परिच्छेद १८ )

या प्रकरणात हजर असलेले वकीलः

याचिकाकर्त्यासाठी वकील श्री. आर. व्यंकटरमणी आणि एस.एम. गर्ग ; अतिरिक्त महान्याय परामर्शी श्री. अल्ताफ अहमद, प्रतिवादींसाठी वरिष्ठ अधिवक्ता श्री व्ही.सी. महाजन, (अधिवक्ता श्री. कृष्ण महाजन, श्रीमती अनिल कटियार, एस.एन. तेरदल, ए.एस. पुंडीर, श्रीमती पी. प्रसाद आणि एन. ए. सुधाकरन, यांचेसमवेत)

न्यायमूर्ती श्री एस. मोहन यांच्याद्वारे न्यायनिर्णय देण्यात आला-

१. सदर जनहित याचिकेद्वारे मूलभूत हक्कांचे समर्थन करणारे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ चे आवाहन करण्यात आले आहे. याचिकाकर्ते घरगुती श्रमिक महिला मंच, दिल्ली (Delhi Domestic Working Women's Forum) यांच्या द्वारे घरकाम करणाऱ्या चार महिला नोकरांच्या दयनीय अवस्थेचे यात वर्णन केले आहे ज्या सैन्यदलाच्या सात कर्मचाऱ्यांनी केलेल्या अभद्र अशा लैंगिक अत्याचाराच्या पीडित आहेत.

२. चित्रपटासारखी पार्श्वभूमी असलेल्या या घटनेने चित्रपटांनाही मागे टाकले आहे. १०/०२/१९९३ रोजी उषा मिंझ, शांती, जोसेफाईन केरकेट्टा, रोझी केरकेट्टा, निली आणि लिली या सहा घरकाम करणाऱ्या महिला मुरी एक्स्प्रेसमध्ये प्रवास करत होत्या. हा प्रवास रांची ते दिल्ली असा होता. पीडितांपैकी एक श्रीमती लिली यांनी या घटनेचे चित्रमय वर्णन खालीलप्रमाणे केलेः

> "मी माझ्या मूळ गावाहून दिल्लीला मुरी एक्स्प्रेसने येत होते.१०/०२/१९९३ रोजी रात्री ११. ०० वाजता मुरी एक्स्प्रेस खुर्जा रेल्वे स्थानकावर होती. त्यावेळी मी माझ्या गावातील (१) उषा मिंझ पि. जॉन मिन्झ (२) शांती पि. सिरी अनुस मिन्झ (३) जोस्फिन केरकेट्टा पि. जुनस केरकेट्टा (४) रोझी केरकेटा पि. रेमिस केरकेट्टा (५) निली रॉस पि. बोआस मिंझ , अशा सर्व मुलींसह एस. एच. आय. डब्यामधून प्रवास करत होते. मी आसन (बर्थ ) क्रमांक ५० वर झोपले. आमची मैत्रीण शांती जागी झाली आणि तिने सांगितले की काही लोक तिची छेड काढत आहेत.मी आणि माझ्या बाकीच्या मैत्रिणी जेव्हा उठलो तेव्हा आम्हाला दिसले की सुमारे ७/८ लष्करी 'जवान' आमच्या जवळ येण्याचा प्रयत्न करत होते. मग आम्ही सर्व मैत्रिणी उठून आपापल्या जागेवर बसलो. त्यानंतर त्या सर्व लष्करी जवानांनी आमची छेड काढून विनयभंग करण्याचा प्रयत्न करू लागले. प्रथम ते दोन शीख आणि ६

स्वच्छ दाढी केलेल्या पुरुषांनी मला आणि माझ्या पाच मैत्रिणींना खालच्या सीटवर बसवले आणि नंतर आमचे चुंबन घेतले आणि मिठी मारली आणि आमच्या शरीराला आणि स्तनांना स्पर्श करू लागले. आमच्या विरोधामुळे त्यांनी आमचे केस पकडले आणि आम्हाला मारहाण करण्यास सुरुवात केली. आम्ही ओरडण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी आमचे तोंड बंद केले. मग त्यांनी मला आणि माझ्या मैत्रिणींना धमकी दिली की जर आम्ही काही आरडाओरडा केला तर ते आम्हाला धावत्या ट्रेनमधून बाहेर फेकून देतील आणि आम्हाला ठार मारतील.यावर आम्ही घाबरलो आणि तिथेच बसलो. ते ८ लष्करी जवान ज्यामध्ये दोन शीख आणि ६ जण स्वच्छ दाढी केलेले होते, त्यापैकी एक सरदार आणि एक स्वच्छ दाढी केलेल्या जवानाने मला जबरदस्तीने खालच्या आसनावर (बर्थवर) झोपवले आणि दुसऱ्या बाजूला खालच्या आसनावर (बर्थवर) दुसऱ्या सरदाराने दुसऱ्या मुलीला नेले आणि एका स्वच्छ दाढी केलेल्या लष्करी जवानाने रोझीला स्नानगृह (बाथरूम ) मध्ये नेले. आणखी दोन लष्करी जवानांनी शांतीला जवळच्या सीटवर झोपायला लावलं. आणखी दोन व्यक्तींनी उषा आणि निलीला नेण्याचा प्रयत्न केला पण त्या दोघीही सीटखाली लपण्यासाठी बसल्या.त्यानंतर, प्रथम सरदार सैनिक (ज्याचे नाव धीरसिंह पि. पूरण सिंग, नेमणूक : दोस्तपूर, पीएसः कलानौर, जिल्हा गुरुदासपूर, पंजाब असे न्यायालयात उघड करण्यात आले आहे) याने जबरदस्तीने माझे कपडे उतरवले आणि अंतर्वस्त्र काढले आणि माझ्यावर बलात्कार केला. त्याच्या पाठोपाठ, आणखी एका स्वच्छ दाढी केलेल्या फौजीने, ज्याचा चेहरा गोल आहे आणि उंची सुमारे ५'८'' आहे त्याने देखील माझ्यावर बलात्कार केला. माझ्या मैत्रिणी शांती आणि रोझी यांच्यावरही उर्वरित लष्करी

जवानांनी जबरदस्तीने बलात्कार केला. त्यानंतर आम्ही वाटेत पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणीही आमचे ऐकले नाही. जेव्हा रेल्वे नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर थांबली, तेव्हा मी आणि माझ्या मैत्रिणींनी त्या लोकांना पकडण्याचा प्रयत्न केला.ते सर्व खाली उतरले आणि इकडे तिकडे धावत सुटले. मात्र, मी आणि माझ्या मैत्रिणींनी उपरोक्त सरदार धीरसिंह याला पकडले, ज्याने माझ्यावर बलात्कार केला होता.आम्ही सर्वांनी मिळून त्याला पकडले. दरम्यान, काही लोक तिथे जमले.लष्कराच्या काही अधिकाऱ्यांनी आणि पोलिसांनी त्याच्यावर ताबा मिळवला आणि त्याला एम. सी. ओ. कार्यालयात नेले. त्यानंतर काही वेळाने ते रेल्वे स्थानकावर आले आणि सरदार धीरसिंह यांना तुमच्याकडे सुपर्द केले. सरदार धीरसिंहने माझ्यावर बलात्कार केला आहे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी माझ्या इतर मैरिणींवर बलात्कार केला आहे.''

३. ही घटना भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६-ख सह कलम ३४१ अंतर्गत गुन्ह्यांसाठी प्रथम खबरी अहवालाचा आधार बनली जे ११/२/२०२३ रोजी सकाळी ६.३५ वाजता रेल्वे पोलिस ठाणे (गुन्हा व रेल्वे) नवी दिल्ली येथे गुन्हा नोंदणी क्रमांक ०४९/१९९३ म्हणून नोंदवले गेले. प्रथम खबरी अहवाल नोंदवल्यानंतर सहा बलात्कार पीडितांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले होते.

४. पिडीतांना भेटण्यासाठी याचिकाकर्ते असलेल्या मंचाचे सदस्य पोलिसांनी दिलेल्या सर्व पत्त्यांवर गटा-गटाने गेले. जरी पीडिता काम करत असलेल्या ठिकाणच्या मालकांनी बलात्काराबाबत माहिती असल्याची आणि पीडित महिला त्यांच्यासोबत असल्याची कबुली दिली तरी देखील कोणत्याही ठिकाणी त्यांना पीडितांना भेटण्याची परवानगी देण्यात आली नाही.

पीडिता ह्या मंचाच्या सदस्य असल्याने त्यांना आवश्यक त्या सामाजिक, सांस्कृतिक आणि कायदेशीर संरक्षण मिळण्यासाठी याचिकाकर्ते असलेले मंच खूप चिंतित आहे. तसेच , पीडित महिला ह्या नियोक्ते आणि पोलिसांच्या दयेवर गुजराण करणाऱ्या बिहार राज्यातील असहाय आदिवासी महिला आहेत. त्यांना धमकाविल्या जाण्याचा धोका देखील आहे. महिलांच्या शरीरावर आणि प्रतिष्ठेवर अशा प्रकारच्या रानटी हल्ल्याच्या घटना घडल्या असूनही, महिलांसाठी पुनर्वसन आणि नुकसानभरपाईच्या न्यायोचित तरतूदीकडे केंद्र किंवा राज्य सरकारने गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. अशा प्रकरणांमध्ये हे न्यायालय दिलासा देत आले आहे. या संदर्भान्वये भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत रिट याचिका दाखल करण्यात आली आहे. रिट याचिकेच्या समर्थनार्थ असलेले मुद्दे खालीलप्रमाणे आहेतः

५. जलद संपरीक्षा ही कायद्याच्या आवश्यक बाबींपैकी एक आहे. अशा स्वरूपाच्या प्रकरणात तपासकार्य लांबवून प्रकरणाची संपरीक्षा दीर्घकाळ प्रलंबित ठेवू शकत नाही. त्यामुळे, या न्यायालयाला सदर प्रकरणांच्या बाबतीत जलद अंमलबजावणीचे आणि तपासाचे निकष स्पष्ट करावे लागतील; अन्यथा संविधानाच्या कलम १४ आणि २१ अंतर्गत हमी दिलेले अधिकार निरर्थक ठरतील.

६. या न्यायालयाने १८-११-१९९३ रोजी उत्तरवादींना नोटीस बजावली.

७. उत्तरवादी क्रमांक २ आणि ४ च्या वतीने प्रति-प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते ज्यात असे म्हटले आहे की, कुमारी लिलीच्या जबाबावरून, भारतीय दंड संहिता कलम ३७६-ख, सह कलम ३४अन्वये प्रथम खबरी अहवाल क्रमांक ०४२/९३ नोंदवण्यात आला आहे. आरोपी धीरसिंह याला अटक करण्यात आली आणि न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले. धीरसिंह

आणि मिखाईल हेरंज या आरोपींच्या विरोधात १३-८-१९९३ रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी, अलीगढ यांच्या न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३ अंतर्गत सदर प्रकरणाचा अहवाल दाखल करण्यात आला होता. अलिगढ येथील जिल्हा व सत्र न्यायालयासमोर सदर प्रकरणाची संपरीक्षा प्रलंबित आहे.

८. या दोन आरोपींव्यतिरिक्त इतरांची ओळख पटू शकलेली दिसत नाही. फरसेम सिंग आणि बी. काजूर या इतर दोन आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. हेड कॉन्स्टेबल रणजीत, कॉन्स्टेबल नरेश सिंग आणि कॉन्स्टेबल शिव सरूप सिंग या इतर तीन पोलिस कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली कारण ते घटनेच्या वेळी मुरी एक्स्प्रेस ट्रेनमध्ये पहारेकरी म्हाणून कर्तव्यावर होते आणि आदिवासी महिला/पीडितांना आवश्यक संरक्षण पुरवण्यात अपयशी ठरले. खटला सुरू आहे आणि हे प्रकरण वर्ग करण्यात येण्याची शक्यता असल्याचे सांगितले जात आहे.

९. खटल्याच्या एका टप्प्यावर, पीडितेचा शोध घेता येत नसल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली. या विधानामुळे आमच्यात निराशा निर्माण झाली. त्यामुळे पीडितांचा शोध घेण्याचे निर्देश उत्तर प्रदेश राज्याला देण्यात आले. या प्रकरणात पोलीस गंभीर आहेत का, अशी शंका या न्यायालयाने व्यक्त केली. आमच्या बाजूने, आम्ही ही बेपर्वाईची वृत्ती सहन करू शकलो नाही . सुदैवाने पीडितांचा शोध लागला आहे. त्यामुळे आम्हाला वाटते की खटला योग्य ती काळजी घेऊन सुरू राहील आणि त्याची कायद्याने वाटचाल होऊ द्यावी.

१०. हे प्रकरण असे असले तरी, १ ते ३ प्रतिवादींनी अशा हिंसाचाराच्या गुन्ह्यातील पीडितांना नुकसानभरपाई आणि पुनर्वसन देण्यासाठी योग्य योजना तयार करण्यात स्वतःला गुंतवावे, या याचिकाकर्त्याच्या विनंतीबाबत सादर केलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेतः

११. महिलांशी संबंधित विविध कायद्यांमधील बदलांचे मूल्यांकन आणि सूचना या मध्ये राष्ट्रीय महिला आयोग योग्यरित्या गुंतलेला आहे. तरीही हिंसाचाराच्या अशा गुन्ह्यांच्या पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी नुकसान भरपाई आणि पुनर्वसन योजना तयार करण्याबाबत पावले उचलली पाहिजेत. अशा हिंसाचाराला बळी पडणारे बहुतांश लोक समाजातील दुर्बल घटकांतील असतात. दिवाणी न्यायालयांच्या माध्यमातून न्याय मिळवण्याच्या स्थितीत ते नाहीत. यात काही शंका नाही की, भारतीय दंड संहिता आणि भारतीय पुरावा कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. असे असूनही, अशा हिंसाचाराच्या पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी पुरेसा उपाय मिळू शकत नाही. त्यामुळे, पहिल्या (तिसऱ्या क्रमांकाच्या) प्रतिवादी राष्ट्रीय महिला आयोगाला अशा योजनेचा मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आणि शक्य तितक्या लवकर योजना तयार करण्यासाठी भारतीय संघराज्यावर दबाव टाकण्यासाठी आवाहन केले पाहिजे.

१२. तिसऱ्या उत्तरवादीने या भूमिकेला विरोध केला आहे. असे नमूद केले आहे की राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम , १९९० (यापूढे 'अधिनियम' म्हणून संबोधले गेले आहे ) द्वारे करण्यात आली होती. अधिसूचना क्र. एसओ ९९ (इ) दिनांक ३१-१-१९९२ नुसार हा कायदा३१-१-१९९२ रोजी लागू झाला. आयोगाची कार्ये अधिनियमाच्या तिसऱ्या प्रकरणात नमूद केली आहेत. आयोगाने योग्य योजना आणि उपाययोजना तयार करण्यात

स्वतःला गुंतवले पाहिजे ही प्रार्थना राष्ट्रीय महिला आयोगाला दिलेल्या जनआदेशाच्या पलीकडे आहे.

१३. आम्ही वरील गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केला आहे. अलिकडच्या काळात महिलांवरील हिंसाचारात वाढ झाली आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे. बलात्कारामुळे फौजदारी न्याय व्यवस्थेसाठी खरोखरच अनेक समस्या निर्माण होतात. कठोर शिक्षांसाठी आक्रोश केला जातो, परंतु अनेकदा अशा आक्रोशामुळे पीडितेची खरी दुर्दशा अधोरेखित होते.बलात्कार हा एक असा अनुभव आहे जो पीडितांच्या जीवनाचा पाया हादरवून टाकतो. अनेकांसाठी, त्याचा परिणाम दीर्घकालीन असतो, ज्यामुळे त्यांची वैयक्तिक नातेसंबंधांची क्षमता दुर्बल होते, त्यांचे वर्तन आणि मूल्ये बदलतात आणि निरंतर भीती निर्माण होते. बलात्काराच्या आघातांव्यतिरिक्त, पीडितांना कायदेशीर कारवाईदरम्यान आणखी यातना सहन कराव्या लागल्या आहेत.

१४. आपण केवळ विद्यमान व्यवस्थेतील दोषांकडे लक्ष वेधू. पहिली गोष्ट म्हणजे, तक्रारी ढोबळपणे हाताळल्या जातात आणि आवश्यकतेनुसार त्यांच्याकडे लक्ष दिले जात नाही. पीडितांना अनेकदा पोलिसांकडून अपमानित केले जाते. पीडितांना नेहमीच बलात्काराच्या खटल्यांचा एक वेदनादायक अनुभव आला आहे. त्यांचा न्यायालयात साक्ष देण्याचा अनुभव नकारात्मक आणि विध्वंसक राहिला आहे. पीडित अनेकदा म्हणतात की, त्यांना ही अग्निपरीक्षा बलात्काराच्या घटनेपेक्षाही वाईट वाटली. निःसंशयपणे, न्यायालयीन कार्यवाहीमुळे बलात्काराच्या परिणामी पीडितांना भोगावे लागलेल्या मानसिक तणावात प्रदीर्घ भर पडली. जेनिफर टेमकिनच्या 'मॉडर्न लीगल स्टडीज ---रेप अँड द लीगल प्रोसेस, १९८७ आवृत्ती, पृष्ठ ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे :

"असे दिसून येईल की, लैंगिक अत्याचाराबाबत बचाव पक्षाचे वकील आणि न्यायाधीश यांच्या वृत्तीतही आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. न्यायाधीशांसाठी सुरू असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये लैंगिक अत्याचाराबाबत पुनर्शिक्षणाचा समावेश असावा. अशा प्रकारच्या गुन्ह्याबद्दल विचार करण्याचे नवीन मार्ग तयार करण्यासाठी सारात्मक विधी कायद्यातील बदल देखील उपयुक्त ठरू शकतात."

केली लिहितातः

"अधिक नुकसानभरपाई आणि पोलिस अधिकाऱ्यांकडून वैयक्तिक वागणुक (चांगली वागणुक) हे सर्वात सामान्य गाऱ्हाणे होते. पीडितांनी टिप्पणी केली की, अधिकाऱ्यांना हाताळण्यासाठी अनेक प्रकरणे आहेत हे त्यांना समजले असले तरी, त्यांना वाटले की अधिकारी त्यांच्या विशिष्ट प्रकरणाबद्दल आणि आघाताबद्दल पुरेसे चिंतित दिसत नाहीत."

शॅपलँडने असा निष्कर्ष काढलाः

"पीडितांच्या सध्याच्या अपेक्षांशी अधिक जवळून जुळवून घेण्यासाठी आवश्यक असलेल्या फौजदारी न्याय व्यवस्थेतील बदल हे मोठे किंवा संरचनात्मक नाहीत. ते प्रामुख्याने मनोवृत्तीविषयक आहेत. त्यात फौजदारी न्याय व्यवस्थेतील व्यावसायिक सहभागींना प्रशिक्षण दिले जाते की पीडितेला विनम्रपणे वागवले जावे, प्रक्रियेच्या सर्व टप्प्यांबद्दल सल्ला आणि माहिती दिली जावी. यात पीडितेला अधिक समान भागीदार म्हणून वागणूक देणे समाविष्ट आहे. यात व्यावसायिक सहभागींच्या कामकाजाच्या पद्धतींमध्ये बदल समाविष्ट असू शकतो ज्यामध्ये सुरुवातीला अधिक काम, अधिक अडचण आणि अधिक प्रयत्नांचा

समावेश असू शकतो, परंतु विरोधाभास म्हणजे याचा परिणाम अधिक सुलभ शोध, फिर्यादी पुराव्यांचा उच्च दर्जा आणि न्यायालयात कमी खटले फेटाळणे यावर होऊ शकतो."

"ओ 'रेली मनोवृत्ती प्रशिक्षणावर अशा प्रकारे जोर देतोः

"आम्ही आता पीडिताभिमुख झालो आहोत आणि संपूर्ण मदत नेटवर्क - वकील, डॉक्टर, परिचारिका, सामाजिक कार्यकर्ते, रेप क्रायसिस सेंटर कर्मचारी यांना बोलण्यासाठी आणि एकत्र संवाद साधण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली आहे. त्यानंतर आम्ही लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्यांना त्यांचे जीवन पुन्हा सुरळीत करण्यासाठी मदत करणाऱ्या आपल्या सर्वांना एकत्र आणणाऱ्या प्राथमिक ध्येयावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करण्याच्या स्थितीत आहोत."

१५. या पार्श्वभूमीवर, बलात्कार पीडितांना मदत करण्यासाठी व्यापक मापदंड सूचित करणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते.

(१) लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांच्या तक्रारदारांना कायदेशीर प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे.फौजदारी न्याय व्यवस्थेची चांगली परिचित असलेली व्यक्ती असणे महत्त्वाचे आहेपीडितेच्या वकिलाची भूमिका केवळ पीडितेला कार्यवाहीचे स्वरूप समजावून सांगणे, तिला खटल्यासाठी तयार करणे आणि पोलिस स्टेशनमध्ये आणि न्यायालयात तिला मदत करणे ही नाही तर तिला इतर संस्थांकडून वेगळ्या स्वरूपाची मदत कशी मिळू शकेल याबद्दल मार्गदर्शन करणे, उदाहरणार्थ, मानसिक समुपदेशन किंवा वैद्यकीय सहाय्य देणे.

पोलिस ठाण्यात तक्रारदाराच्या हिताची काळजी घेणारी व्यक्तीच प्रकरणाच्या शेवटापर्यंत तिचे प्रतिनिधित्व करेल याची खात्री करून मदत सुरू ठेवणे सुनिश्चित करणे महत्वाचे आहे.

(२ ) पोलिस स्टेशनमध्ये कायदेशीर मदत द्यावी लागेल कारण लैंगिक अत्याचार पीडित मुलगी पोलिस स्टेशनमध्ये आल्यावर खूप व्यथित स्थितीत असू शकते, या टप्प्यावर आणि तिची चौकशी केली जात असताना वकिलाचे मार्गदर्शन आणि समर्थन तिला खूप मदत करेल.

(३) पीडितेला कोणतेही प्रश्न विचारण्यापूर्वी तिच्या प्रतिनिधीत्वाच्या अधिकाराची माहिती देणे हे पोलिसांचे कर्तव्य असले पाहिजे आणि पोलिस अहवालात असे नमूद केले पाहिजे की पीडितेला तशी माहिती देण्यात आली होती.

(४) या प्रकरणांमध्ये कारवाई करण्यास इच्छुक असलेल्या वकिलांची यादी, ज्यांच्या मनात विशिष्ट वकील नव्हता किंवा ज्यांचा स्वतःचा वकील उपलब्ध नव्हता अशा पीडितांसाठी पोलीस ठाण्यात ठेवली पाहिजे.

(५) पोलिसांनी अर्ज केल्यावर न्यायालयाकडून सोयीस्करक्षणी लवकरात लवकर वकिलाची नियुक्ती केली जाईल, परंतु पीडितांची अनावश्यक विलंब न करता चौकशी केली गेली आहे हे सुनिश्चित करण्यासाठी, न्यायालयाची परवानगी मागण्यापूर्वी किंवा मिळवण्यापूर्वी पोलिस ठाण्यात कारवाई करण्यासाठी वकिलांना अधिकृत केले जाईल.

(६) बलात्काराच्या सर्व खटल्यांमध्ये आवश्यकतेनुसार पीडितेची अनामिकता राखली गेली पाहिजे.

(७)  भारतीय राज्यघटनेच्या कलम ३८ (१)  अंतर्गत असलेल्या निर्देशक तत्त्वांचा विचार करून फौजदारी क्षतिपूर्ती भरपाई मंडळाची स्थापना करणे आवश्यक आहे.बलात्कार पीडितांना अनेकदा मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागते. उदाहरणार्थ, काहींना नोकरी सुरू ठेवणे  खूप क्लेशकारक असू शकते.

(८)  गुन्हेगाराला दोषी ठरवल्यानंतर न्यायालय आणि दोषसिद्धी झाली असो वा नसो , वरीलप्रमाणे पीडितांसाठी नुकसानभरपाई दिली जाईल. वेदना आणि क्लेश तसेच गर्भधारणेमुळे झालेल्या कमाईतील नुकसान आणि बलात्काराच्या परिणामी हे घडले तर बाळाच्या जन्माचा खर्च मंडळ विचारात घेईल.

१६.  या प्रकरणाच्या या पैलूवर आपण ऑक्सफर्ड हँडबुक ऑफ क्रिमिनोलॉजी (१९९४ एडन.) मधील खालील परिच्छेदाचा उपयुक्तपणे संदर्भ घेऊ शकतो. इंग्लंडमधील स्थितीबद्दल पृष्ठे १२३७ - ३८ वर नोंद आहे.

'' गुन्हेगाराने द्यावी लागणारी नुकसान भरपाई फौजदारी न्याय कायदा, १९७२  मध्ये सादर करण्यात आली होती, ज्याने न्यायालयांना 'दुखापत, नुकसान किंवा नुकसान' झालेल्या प्रकरणांमध्ये मुख्य दंडाच्या व्यतिरिक्त नुकसानभरपाईसाठी पूरक आदेश देण्याचे अधिकार दिले होते.फौजदारी न्याय कायदा, १९८२ ने प्रथमच एकमेव दंड म्हणून नुकसानभरपाईचा आदेश देणे शक्य केले. ज्या प्रकरणांमध्ये दंड आणि नुकसानभरपाईचे आदेश एकत्रितपणे देण्यात आले होते, त्या प्रकरणांमध्ये नुकसानभरपाई भरण्याला दंडापेक्षा प्राधान्य दिले गेले पाहिजे, असेही त्यात नमूद करण्यात आले होते.या घडामोडींनी दंडात्मक विचारांमध्ये एक मोठा बदल सूचित केला, जे पारंपरिक शिक्षेच्या अधिक संकुचित सूड उगवण्याच्या उद्दिष्टांपेक्षा

हानिपूर्ति आणि नुकसान हानिपूर्तिशी जोडलेले वाढते महत्त्व प्रतिबिंबित करते. फौजदारी न्याय कायदा, १९८८ ने हा बदल पुढे नेला. मृत्यू, दुखापत, नुकसान किंवा नुकसान या प्रत्येक प्रकरणात नुकसानभरपाईचा आदेश देण्याचा विचार करणे आणि असा आदेश न दिल्यास, तसे न करण्याची कारणे देणे हे न्यायालयावर कर्तव्य लादणे आवश्यक होते. त्याने नुकसानभरपाईसाठी पात्र असलेल्या दुखापतींची व्याप्ती देखील वाढवली.या नवीन आवश्यकतांचा अर्थ असा आहे की जर न्यायालय नुकसानभरपाईचा आदेश देण्यात अयशस्वी ठरले तर त्यांनी कारणे दिली पाहिजेत. जिथे कारणे दिली जातात, तिथे पीडित व्यक्ती न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन राहण्यासाठी अर्ज करू शकते.....

१९९१ च्या फौजदारी न्याय कायद्यात अशा अनेक तरतुदी आहेत ज्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे नुकसानभरपाईसाठी आणखी मोठ्या भूमिकेला प्रोत्साहन देतात.''

१७. अधिनियमाच्या कलम १० मध्ये असे म्हटले आहे की राष्ट्रीय महिला आयोग खालीलपैकी सर्व किंवा कोणतीही कार्ये करेल, म्हणजेः

(अ) राज्यघटना आणि इतर कायद्यांनुसार महिलांना प्रदान केलेल्या सुरक्षेशी संबंधित सर्व बाबींची चौकशी आणि तपासणी करणे.

(ब) महिलांवरील भेदभाव आणि अत्याचारांमुळे उद्भवलेल्या विशिष्ट समस्या किंवा परिस्थितींचा विशेष अभ्यास किंवा तपास करण्याचे मागणी करा आणि त्या दूर करण्यासाठी धोरणांची शिफारस करण्यासाठी अडथळे ओळखा.

१८.	वरील तरतुदींचा विचार करता, तिसऱ्या प्रतिवादीला अशा दुर्दैवी पीडितांचे अश्रू पुसण्यासाठी अशी योजना विकसित करावी लागेल. अशी योजना या निर्णयाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत तयार केली जाईल. त्यानंतर, भारतीय संघराज्य याची तपासणी करेल आणि योजना अंमलबजावणीसाठी लवकरात लवकर आवश्यक ती पावले उचलेल.

१९. वरील निर्देशांच्या अधीन राहून रिट याचिका निकाली काढली जाते.

****

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय  हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

****